## ठळक बातम्या

- कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्राचा जबाबदारीनं वापर आणि नियमनासाठी जागतिक पातळीवर एकत्रित प्रयत्नांची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त
- दहावी- बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी होणाऱ्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
- सेन्सेक्स १ हजार अंकांनी घसरला, चांदी लाखाच्या उंबरठ्यावर
- ज्येष्ठ साहित्यिक रा रं बोराडे यांचं निधन

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भ उपांत्य फेरीत

**<><><><><>**

AI अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्राचा जबाबदारीनं वापर आणि नियमन यासाठी जागतिक पातळीवर एकत्रितरित्या प्रयत्न करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. पॅरिसमध्ये AI कृती परिषदेत सह अध्यक्षपदावरुन ते संबोधित करत होते. सह अध्यक्ष फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यावेळी उपस्थित होते. या तंत्रज्ञानाचं भविष्य यंत्र नव्हे तर मानवाच्या हातात आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा विकास जबाबदारी, सामाजिक आणि नैतिक हित ध्यानात ठेवून होईल, याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

शिक्षण, आरोग्य, कृषी यासारख्या अनेक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. त्यासाठी या तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण,

लोकाभिमुख पणा आणि जगातल्या कमी विकसित देशांनाही याचा लाभ मिळेल, याकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या क्षेत्रात भारतानं घेतलेल्या आघाडीची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. देशाच्या भाषिक आणि सांस्कृतिक गरजा लक्षात घेऊन भारत स्वतःचं Large language model विकसित करतो आहे. पीपीपी तत्त्वावर हे सुरू असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

दहावी- बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार आढळल्यास त्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले आहेत. तसंच कॉपीसाठी मदत करणाऱ्या, शिक्षक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश ही त्यांनी दिले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज त्यांनी राज्यातल्या सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी आणि भरारी पथक, ड्रोन आणि व्हिडीओ कॅमेरांद्वारे नजर ठेवण्याच्या अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

राज्य सरकारनं कंत्राटी तत्त्वावरची शिक्षक भरती रद्द करण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भातला शासन आदेश काल प्रसिद्ध झाला. सध्या कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांचं कंत्राट पूर्ण झाल्यावर त्याचं नुतनीकरण होणार नाही.

**<><><><><>**

राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात तासिका तत्वावरच्या अधिव्याख्यात्यांचं मानधन वेळेवर देण्याचे निर्देश उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. तासिका तत्वावर असणाऱ्या अधिव्याख्यात्यांना दरमहा मानधन मिळेल असं नियोजन करावं असं त्यांनी म्हटलं.

**<><><><><>**

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल उभारणार असून पहिल्या टप्प्यात १० मॉल उभारणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत बांद्रा-कुर्ला संकुलात महालक्ष्मी सरस विक्री आणि प्रदर्शनाचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झालं. राज्यात आगामी कालावधीत एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. २३ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात एकूण ५०० पेक्षा जास्त स्टॉल लागले आहेत.

**<><><><><>**

येत्या आर्थिक वर्षापासून दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरता जिल्हा वार्षिक योजनेतून एक टक्का निधी राखीव ठेवण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भातला शासन आदेश काल जारी झाला. या निधीच्या योग्य विनियोग होण्यासाठी सुस्पष्ट आदेश लवकरच नियोजन विभाग, वित्त विभागाच्या मान्यतेने दिव्यांग कल्याण विभाग निर्गमित करेल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात काल 37 वर्षीय रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्यात या आजाराने आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, राज्यातील जीबीएस रुग्णसंख्या 192 झाली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेची व्यापारसंबंधीची धोरणं आणि करआकारणी विषयीची अनिश्चितता यांचा परिणाम आज सलग पाचव्या दिवशीही भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. सेन्सेक्स आज १ हजार १८ अंकांनी घसरुन ७६ हजार २९४ अंकांवर बंद झाला. निफ्टी आज ३१० अंकांनी घसरुन २३ हजार ७२ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

सोन्याचे दर मात्र काहीसे घसरले. आज २४ कॅरेट सोन्याचा दर तोळ्यामागे ८७ हजार ७७० रुपये इतका होता. २२ कॅरेट सोन्याचा आजचा दर तोळ्यामागे ८५ हजार ५० रुपये इतका होता.
चांदीचे दर आज आणखी दोन हजार रुपयांची भर पडली. चांदीचा आजचा दर किलोमागे ९९ हजार ४०० रुपये इतका होता.

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं झालेल्या जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेच्या धर्तीवर वेव्हज २०२५ ही परिषद मनोरंजन क्षेत्रातली जागतिक परिषद ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्यासह इतरांशी मुंबईत मंत्रालयात आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत

होते. यासाठी राज्य शासनाकडून आणि मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्रत्येकी एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी आज मुंबईत दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सर्व विभागांची माहिती जाणून घेतली आणि अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी विभागप्रमुखांना सूचना दिल्या. मे महिन्यात १ ते ४ तारखेदरम्यान होणाऱ्या waves परिषदेच्या तयारीचाही आढावा त्यांनी यावेळी घेतला.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्धक्याने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेले काही दिवस रुग्णालयात उपचार सुरु होते.

कथा, कादंबरी नाटक व समीक्षा या प्रकारात त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण साहित्यनिर्मिती केली. त्यांची ‘पाचोळा’ ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय ‘तलफ’, ‘बुरूज’, यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या होत्या. चुकभूल घ्यावी द्यावी, चोरीचा मामला, मी आमदार सौभाग्यवती मलाच तुमची म्हणा यासारखी अनेक नाटकं त्यांनी लिहिली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. गेल्या आठवड्यात राज्य शासनानं विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही बोराडे यांना जाहीर केला होता. बोराडे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार

यांनी शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या अंगार सौभाग्यवती कादंबरीचं नाट्य रुपांतर झालं होतं.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. कोलकाता इथं झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात, मुंबईनं आज हरयाणावर १५२ धावांनी विजय मिळवला. मुंबईनं पहिल्या डावात ३१५, तर दुसऱ्या डावात ३३९ धावा केल्या. दुसऱ्या डावात आज कर्णधार अजिंक्य रहाणेनं १०८ धावा केल्या. हरयाणानं पहिल्या डावात ३०१ धावा केल्या होत्या. मात्र त्यांचा दुसरा डाव २०१ धावात आटोपला.
नागपुरात झालेल्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात, विदर्भानं तामीळनाडूवर १९८ धावांनी मात केली. विदर्भानं पहिल्या डावात करुण नायरच्या शतकी खेळीच्या जोरावर ३५३, तर दुसऱ्या डावात यश राठोडच्या शतकामुळे २७२ धावांची मजला मारली. तामीळनाडूनं पहिल्या डावात २२५, तर दुसऱ्या डावात २०२ धावा केल्या.

<><><><><>

मुंबईत पवईतल्या जयभीम नगर इथली मागासवर्गीयांची घरे नियमबाह्य पद्धतीने तोडणारे अधिकारी आणि बिल्डरवर गुन्हा दाखल झाला आहे. गेल्यावर्षी ही घरं पाडताना लहान मुलं, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिक यांना पोलिसांनी मारहाण केल्याची तक्रार या कुटुंबांनी केली होती. त्यानंतर एका पिडीतेनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयानं स्थापन केलेल्या विशेष तपास पथकानं केलेल्या चौकशीत ही कारवाई नियमबाह्य

असल्याचं सिद्ध झालं होतं. त्यानंतर न्यायालयानं दिलेल्या आदेशानुसार काल गुन्हा दाखल करण्यात आला.

**//<><><><><>//**